# :धनगर आरक्षण:

स्वतंत्र सार्वभौम प्रजासत्ताक भारताची घटना, घटना समितीने मान्य करून ती १९४९मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी देशाला अर्पण केली. घटनेत मागासवर्गाचे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि अन्य मागासवर्गीय असे तीन भाग करून त्यांना निरनिराळ्या सवलती आरक्षित केल्या. या तीन प्रकारांत कोणती जात-जमात कोणत्या वर्गात समाविष्ट आहे हे दर्शविणारी तीन परिशिष्टे घटनेत जोडली आहेत. यातील परिशिष्ट नंबर दोन (अनुसूचित जमातीची यादी)मध्ये छत्तीस क्रमांकावर ओरान आणि धनगड या जातींचा उल्लेख आहे. यातील धनगड म्हणजेच धनगर होय. भारताची घटना इंग्रजी व हिंदीत लिहिली आहे. भाषा शास्त्रानुसार जसे ताकारी यांचे ताकाडी, जाखरचे जाखड, गुरगावचे गुडगाव होते तसेच धनगरचे धनगड झालेले आहे. परंतु, धनगर व धनगड नावाच्या वेगवेगळ्या जमाती आहेत आणि घटनेच्या परिशिष्ट दोनमध्ये छत्तीस क्रमांकावरचा उल्लेख धनगड असा आहे, धनगर असा नाही, असे तर्कट करून तत्कालीन राज्यकर्त्यांनी धनगर समाजाचे आरक्षण नाकारले आणि अज्ञान, दारिद्र्य, उपेक्षेचे जीवन जगणाऱ्या धनगर समाजाच्या विकासाच्या मार्गात धोंड निर्माण केली. वास्तविक धनगर आणि धनगड हे दोन्ही शब्द एकाच अर्थाचे आहेत हे न समजण्याएवढे तत्कालीन राज्यकर्ते अज्ञानी होते का? धनगड नावाची वेगळी जमात महाराष्ट्रात नसताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महाराष्ट्रातील मागास जमातीच्या यादीत धनगड जमातीचा समावेश केला तो कुणाचा आहे? तो धनगरांचाच व धनगरांसाठीच आहे. बाबासाहेबांना महाराष्ट्राची सामाजिक स्थिती पूर्ण माहिती होती. त्यांनी जाणीवपूर्वक धनगर समाजाचे मागासलेपण लक्षात घेऊन ती जात सुधारून इतर प्रगत समाजाबरोबर आली पाहिजे, या जाणिवेनेच अनुसूचित जमातीच्या यादीत धनगरांचा समावेश केलेला असताना ही ‘र’ आणि ‘ड’चे खुसपट काढून धनगर समाजाच्या डोक्यात अन्यायाची कुऱ्हाड मारून त्यास गेली साठ वर्षे विकासाविना वंचित ठेवले. घटनेत समावेश असूनही आपल्याला जाणीवपूर्वक आरक्षणापासून वंचित ठेवण्याचा दुष्टावा राज्यकर्ते करताहेत, याची चीड येऊन अन्य कुठल्याही घटकावर अन्याय झाला असता, तर तो समाज पेटून उठला असता, आंदोलन केले असते; पण धनगर समाजाने १९५६ साली आंदोलन केले का? नाही केले. यांचे कारण आरक्षणाचा अर्थ, त्याचे फायदे इत्यादी बाबी समजण्याची त्याची कुवतच तेव्हा नव्हती आणि आजही नाही. त्यामुळेचतरराज्यकर्त्यांनाधनगरांचीशिकारकरण्याचीसंधीलाभली.

धनगर समाजातील काहींना आपल्यावरील अन्यायाची अर्धवट जाणीव वीस वर्षांनंतर झाली. १९७५ ते ७७ च्या सुमारास तत्कालीन राज्यकर्त्यांमागे त्यांनी तगादा लावला. आरक्षणामुळे जाती, जमाती सुधारू

लागल्या, आम्हाला आरक्षण नाही, आम्ही मागे राहू लागलो आहोत. इतरांबरोबर येण्यासाठी आमचा अनुसूचित जमातीत समावेश करा, अशी मागणी झाली. त्यावर निवडणुकीपूर्वी करू, म्हणून सरकारने धनगर समाजाचा अनुसूचित जमातीत समावेश करण्याची शिफारस केंद्र सरकारकडे १९७७मध्ये केली. निवडणूक झाल्यावरतीमागेघेतलीकिंवाकेंद्रसरकारनेतीपरतपाठवली.

१९७७मध्ये देशाच्या राजकारणात उलथापालथ झाली. तीस वर्षे सत्तेवर असलेल्यांचे सरकार गेले. आवळ्याची मोट बांधलेले जनता पक्षाचे सरकार सत्तेवर आले वगैरे ज्या घडामोडी त्यामध्ये देशातील समाज जीवन ढवळून निघाले. त्यात धनगर समाजातील काहींना थोडीफार जाग आली. परंतु, अभ्यास न करता धनगर समाजाचा अनुसूचित जमातीत समावेश करा ही चुकीची मागणी वारंवार होत गेली आणि सरकार ती फेटाळत गेले. १९९२मध्ये आम्ही काही धनगर समाजातील लोकांनी 'धनगर समाज महासंघ' उभा करून समाजाच्या समस्या, प्रश्न याचा अभ्यास केला. तेव्हा लक्षात आले की, धनगर समाजाचा अनुसूचित जमातीत समावेश करण्याची मागणी चुकीची आहे. समाजाचा अनुसूचित जमातीत नव्याने समावेश करायचा नसून तो घटनेत अगोदरच केलेला आहे. त्याच्या अंमलबजावणीची मागणी करायला हवी. त्याबाबत आम्ही जागृती करीत होतो. परंतु, समाजात एकसंधपणा येत नव्हता, सगळे एका व्यासपीठावर येत नव्हते. मी ज्या पक्षात होतो तो पक्षही मनापासून या विषयात लक्ष घालत नव्हता. अशा काही कारणाने तो पक्ष सोडून नव्या पक्षात गेलो. २००४मध्ये झालेल्या सार्वत्रिक निवडणुकांच्या निमित्ताने निरनिराळ्या पक्षांनी जाहीरनामे प्रसिद्ध केले होते. त्यात 'धनगर समाजाला घटनेने आरक्षण दिले आहे. ते आमचा पक्ष सत्तेवर आल्यावर लागू करील,' असा मजकूर समाविष्ट करण्याचे आमच्या संघटनेने सूचित केले. त्याला थोडेफार यश आले. याचा परिणाम असा झाला की, धनगर समाजाचे नेते म्हणवून घेणारेही धनगर समाजाला घटनेने दिलेले आरक्षण त्वरित लागू करण्याचीमागणीकरूलागले.

२०१४मध्ये लोकसभेच्या निवडणुका झाल्या. त्यात नरेंद्र मोदींना अभूतपूर्व यश मिळाले. साठ वर्षांनंतर केंद्रीय सत्तेत परिवर्तन होऊन ते देशाचे पंतप्रधान झाले. यामुळे सर्व पक्षांचे डोळे खाड्कन उघडले आणि आगामी विधानसभा निवडणुकीच्या दृष्टीने जनमत संग्रह करायला सर्वांनी सुरुवात केली. याचाच भाग म्हणून राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी १६ जून २०१४ रोजी मुंबईत राष्ट्रवादी भवनात धनगर समाजाचे सर्व आमदार व सर्व संघटनांच्या प्रतिनिधींची बैठक बोलावून आरक्षण प्रश्नांवर प्रदीर्घ चर्चा केली. हीच बैठक दुसऱ्या दिवशी म्हणजे १७ जूनला पुढे चालवून संबंधित शासकीय अधिकाऱ्यांशी चर्चा केली. त्यानंतर सर्वानुमते असे ठरले की, धनगर समाजाच्या आरक्षणाबाबत आयोग नेमायचा. थोड्या दिवसांची मुदत देऊन धनगड आणि धनगर दोन्ही शब्द एकार्थी आहेत, असा निर्णय करून घेऊन ३१ जुलै २०१४च्या आत

धनगर समाजाला आरक्षण जाहीर करायला सरकारला भाग पाडायचे. सगळया कार्यकर्त्यांत आनंदाचे वातावरण असतानाच दुधात मिठाचा खडा पडावा, तसे झाले. काही राजकीय पुढाऱ्यांच्या प्रोत्साहनाने माळशिरस येथे काही कार्यकर्ते म्हणवणाऱ्यांची (जे आरक्षणांच्या लढ्यात फारसे कुठे पुढे आले नव्हते.) बैठक झाली व त्यात असा विषय मांडला गेला की, धनगर समाजाचे आरक्षण हे पवार आणि अजित पवार यांनीच रोखले आहे. त्यांच्याविरोधात मोर्चा न्यायचा. पंढरपूर ते बारामती असा मोर्चा काढायचा, हा निर्णय झाला. वास्तविक, या मोर्चाची दाखल घ्यावे असे वरिष्ठ शासकीय केंद्र बारामतीत नसताना किंवा पवार, अजित पवार यांना कल्पना देऊन आम्ही तुमच्याशी चर्चा करणार आहे, अशी भूमिका न घेता १५ जुलै २०१४पासून पंढरपूर ते बारामती मोर्चा सुरू झाला. बारामतीत गेल्यावर बैठा सत्याग्रह करायची भूमिका नेत्यांनी घेतली. समाजाचे क्रांतिकारक पाऊल पडत आहे, आता आपला आरक्षणाचा प्रश्न सुटणार या भावनेने गावागावांतून समाजबांधव बारामतीकडे धावू लागले. परंतु, तेथे शरद पवार आणि अजित पवार यांच्यावर तोंडसुख घेणे एवढाच कार्यक्रम तेथे सुरू होता. या प्रकारामुळे शरद पवार उद्विग्न होणे सहाजिकच होते. त्यांनी या विषयातून अंगच काढून घेतले आणि ३१ जुलैच्या आत आरक्षणाचा प्रश्न मार्गी लावण्याचा विचार मागे पडला. समाजाच्या तथाकथित नेत्यांनी गुणांची उधळण करून आपल्याच समाजाला असे अडचणीत टाकले.

बारामतीतील मोर्चाच्या समारोपास विद्यमान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस गेले होते. त्यांनी आमचे सरकार आल्यास आठ दिवसांच्या आत धनगर समाजाला आरक्षण देईन, असे आश्वासन दिले होते. मात्र, फडणवीसांचे सरकार येऊन तीन वर्षे झाली. तरीही, आरक्षणाचा प्रश्न सोडवलेला नाही. उलट टाटा कन्सल्टन्सीकडे प्रकरण सोपवून नको तो उद्योग चालू केला आहे. फडणवीस सरकारला धनगर आरक्षण समाजाला आरक्षण द्यायचे असते, तर ११ डिसेंबर २०१७पासून सुरू होणाऱ्या नागपूर अधिवेशनातच केंद्र शासनाकडे शिफारस केल्याचे जाहीर करून करावी लागेल. तरच केंद्र सरकारकडून त्याला मान्यता मिळून धनगर समाजाच्या पदरात आरक्षण पडेल. राज्य सरकार हा विषय जेवढा लांबणीवर टाकेल, तेवढे केंद्रास निर्णय करून आरक्षण देणे अडचणीचे होणार आहे. धनगर आरक्षणाला विरोध करणारे काही घटक न्यायालयात जाऊन सरकारच्या निर्णयाला आवाहन देण्याची शक्यताही नाकारता येत नाही. या सर्व अडचणींतून धनगर समाजाला आरक्षण मिळायचे असेल, तर सरकारने आत्ताच अत्यंत जलद पाऊल उचलण्याची गरज आहे. नाही तर सरकारने धनगर समाजाला आरक्षण देण्याची केंद्र सरकारकडे शिफारस केली, मते उपटली आणि धनगर समाजाच्या पदरात मात्र काहीच पडले नाही, असे होण्याची शक्यता नाकारता येत नही.

# धनगर आरक्षणः वस्तुस्थिती व राजकारण

अनेक प्रकारच्या संशोधनांअंती घटना समितीच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्रात धनगर या जातीचा समावेश भटक्या जमातींत केला गेला आहे. अनुसूचित जमातींच्या यादीत असलेल्या 'धनगड' या जातीची वैशिष्ट्ये 'धनगर' या जातीशी जुळत नाहीत. तरीही मुद्रणछपाईच्या चुकीचा मुद्दा उपस्थित करून दिशाभूल करण्याचे काम सुरू आहे.

अनेक प्रकारच्या संशोधनांअंती घटना समितीच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्रात धनगर या जातीचा समावेश भटक्या जमातींत केला गेला आहे. अनुसूचित जमातींच्या यादीत असलेल्या 'धनगड' या जातीची वैशिष्ट्ये 'धनगर' या जातीशी जुळत नाहीत. तरीही मुद्रणछपाईच्या चुकीचा मुद्दा उपस्थित करून दिशाभूल करण्याचे काम सुरू आहेधनगर समाजाचा अनुसूचित जमातींच्या (आदिवासी) यादीत समावेश करण्यासंबंधीचा धुरळा पुन्हा एकदा महाराष्ट्राच्या राजकीय पटलावर उडाला आहे. पार्श्वभूमी अर्थातच होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीची आहे. याला प्रतिक्रिया म्हणून राज्यातील सर्व आदिवासी आमदारांनी राज्यपालांची भेट घेऊन यासंबंधीचा प्रस्ताव केंद्राकडे न पाठवण्यासंबंधीचे निवेदन दिले. प्रसंगी आपापल्या पदांचाराजीनामादेण्याचीतयारीदर्शविलीआहे.

वास्तविक भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३४२खाली महाराष्ट्र राज्य क्षेत्रासंबंधी सप्टेंबर १९५० रोजीच्या राष्ट्रपतींच्या पहिल्या आदेशात आणि त्यानंतर महाराष्ट्र राज्याच्या बाबतीत संसदेने वेळोवेळी सुधारणा केलेल्या अनुसूचित जमातीच्या याद्या सूचिबद्ध केलेल्या आहेत. त्यामध्ये धनगर अशी नोंद नाही. संविधान (अनुसूचित जमाती) आदेश १९५० अन्वये मुंबई प्रांतासाठी प्रसिद्ध करण्यात आलेल्या अनुसूचित जमातींच्या यादीत ओरॉन, धनगड जमातीचा उल्लेख नाही. अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींच्या यादीत Oraon, including Dhanka and Dhangad अशी नोंद आहे. मुंबई राज्य पुनर्रचना कायदा, १९६०अन्वये महाराष्ट्र राज्यासाठी प्रसिद्ध करण्यात आलेल्या अनुसूचित जमातीच्या सूचीमध्ये Oraon, including Dhanka and Dhangad अशी नोंद केलेली होती, आणि यासाठी अमरावती जिल्ह्यातील मेळघाट तहसली, चांदा जिल्ह्यातील गडचिरोली आणि सिरोंचा तहसील, यवतमाळ जिल्ह्यातील केळापूर, वणी आणि यवतमाळ तहसील हे क्षेत्र निर्धारित करण्यात आलेले होते. अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती आदेश (सुधारणा) कायदा, १९७६ अन्वये महाराष्ट्र राज्यासाठी प्रसिद्ध करण्यात आलेल्या अनुसूचित जमातींच्या यादीत धनगर, ओरॉन, धनगड अशी नोंद करण्यात आली आहे. उपसचिव, समाजकल्याण यांनी १२ जून १९७९ रोजी धनगर जातीचा अनुसूचित जमातीच्या यादीत समावेश करण्याकरिता केंद्र शासनास शिफारस केलेली होती. तथापि

एखाद्या जातीचा/ समाजाचा, अनुसूचित जमातीत समावेश करण्याकरिता निकष निर्धारीत केलेले आहेत. ते निकष धनगर जात पूर्ण करीत नसल्याने समाजकल्याण विभागाने केलेली शिफारस पुनर्विचाराअंती मागे घेण्यातआलीआहे.

महाराष्ट्र शासनाच्या १९६७मधील निर्णयानुसार धनगर या जातीचा समावेश महाराष्ट्राच्या इतर मागासवर्गाच्या यादीत करण्यात आला. सद्यस्थितीत, महाराष्ट्र राज्यातील धनगर ही एक प्रमुख जात आहे आणि तिचा महाराष्ट्र राज्याच्या भटक्या जमातीच्या यादीत समावेश असून संबंधित लाभ अनुज्ञेय आहेत. तसेच, महाराष्ट्र राज्यात भटक्या जमाती (क) (धनगर व तत्सम जमाती) साठी ३.५ टक्के इतके आरक्षण सध्या देण्यात येते. तर, १ कोटी ५ लाख लोकसंख्या असलेल्या महाराष्ट्राच्या अनुसूचित जमातींच्या यादीत सद्यस्थितीत एकूण ४५ अनुसूचित जमातींचा समावेश असून त्यांना एकूण ७ टक्के इतके आरक्षण लागू आहे.

अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती आदेश (सुधारणा) कायदा, १९७६ अन्वये महाराष्ट्र राज्यासाठी प्रसिद्ध करण्यात आलेल्या अनुसूचित जमातींच्या यादीत धनगर, ओरॉन, धनगड अशी नोंद करण्यात आली आहे. नामसदृश्याचा फायदा घेऊन अनुसूचित जमातीसाठी शासनाने देऊ केलेल्या सवलती घेणाऱ्या बोगस आदिवासींच्या संख्येत १९७६ नंतर मोठ्या प्रमाणावर वाढ झाल्याचे जनगणनेच्या आकडेवारीवरून स्पष्ट झाले आहे. महाराष्ट्रात ओरॉन, धनगड या जमातींची संख्याही वरखाली झाली आहे.

महाराष्ट्रामधील धनगर ही 'भटक्या जमाती- क'च्या यादीमध्ये समाविष्ट असलेली जात व ओरॉन, धनगड ही अनुसूचित जमातींच्या यादीमध्ये समाविष्ट असलेली जमात या भिन्न जाती आहेत. त्यामुळे अनुसूचित जाती जमाती सुधारीत आदेश, २००२ अन्वये महाराष्ट्र, मध्य प्रदेश व छत्तीसगड राज्यासाठी प्रसिद्ध करण्यात आलेल्या अनुसूचित जमातींच्या यादीमध्ये Oraon (ओरॉन) ची तत्सम जमात म्हणून नमूद केलेली Dhangad (धांगड) ही नोंद बरोबर आहे. केंद्र शासनाच्या आदिवासी विकास मंत्रालयाने महाराष्ट्रातील अनुसूचित जमातीच्या यादीत ३६ क्रमांकावर असलेली धांगड ही ओरानची उपजमात असून शेती हा त्यांचा व्यवसाय आहे, तर मेंढी व गुरांचे पालन हा धनगरांचा व्यवसाय असल्याचे स्पष्ट केले आहे. महाराष्ट्रातील धनगर समाजाचा समावेश भटक्या विमुक्त जातीत करण्यात आल्याने ही प्रिंटिंग मिस्टेक नसल्याचे स्पष्ट केले आहे.

जाती, जमातींची नावे व त्यांच्या वैशिष्ट्यांबाबत राज्यघटनेच्या मसुदा समितीमध्ये झालेल्या चर्चेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर असे स्पष्टपणे म्हणाले होते की, 'नामसदृश जाती किंवा जमातींना मूळ जाती-जमातींच्या सवलती मिळणार नाहीत. त्याचप्रमाणे एका राज्यातील लाभार्थी जात किंवा जमात दुसऱ्या

राज्यात लाभार्थी जात किंवा जमात असेलच असे नाही, किंबहुना ती नसणारच.' म्हणून शुद्धलेखनातील चुका काढणेम्हणजेभारतीयराज्यघटनाआणिघटनासमितीलाचआव्हानदेणेआहे.

महाराष्ट्र शासनाच्या १२ जुलै २००५ रोजी झालेल्या बैठकीतील निर्णयान्वये कार्यान्वित संशोधन पथकाने आपल्या सर्वेक्षण अहवालात असे नमूद केले आहे की, महाराष्ट्र राज्यातील धनगर (Dhangar) जातीच्या चालीरीती, रूढी, परंपरा, देवदेवता व पारंपारिक व्यवसाय हा धांगड (Dhangad) जमातीपेक्षा भिन्न असून या दोन्ही जाती जमाती एकमेकांपेक्षा भिन्न आहेत. अलाहाबाद उच्च न्यायालयानेही रिट क्र. ४०४६६२/२००९ मध्ये निकाल देताना महाराष्ट्रातील धनगर समाजाचा अनुसूचित जमातीमध्ये समावेश करण्याबबातसर्वंकषविचारकेलाआहे.

महाराष्ट्र शासन विरुद्ध मिलिंद कटवारे व इतर या विशेष अनुज्ञा याचिकेमध्ये सर्वोच्च न्यायालयाने दिनांक २८ नोव्हेंबर २०००मध्ये अंतिम निर्णय देताना राष्ट्रपतींनी जाहीर केलेल्या अनुसूचित जमातींच्या यादीमध्ये शासनास कुठल्याही न्यायालयास व इतर कोणत्याही प्राधिकाऱ्यास कोणताही बदल/ सुधारणा करण्याचे अधिकार नसल्याचे निरीक्षण केलेले आहे. राज्यघटनेच्या कलम ३४२ (१) नुसार अनुसूचित जमातींच्या यादीत एखाद्या जमातीचा समावेश करणे किंवा वगळणे हा अधिकार फक्त संसदेला आहे.

**लढा धनगर समाज आरक्षणाचा**

**राज्यघटनेत तरतूद करूनही धनगर समाजाला आरक्षणापासून वंचित ठेवले आहे. त्याबाबत सरकारने भाषाशास्त्रीय वादापेक्षा कृतीवर भर देऊन समाजाला न्याय द्यावा.**

राज्यघटना बनवताना घटना समितीने पुढारलेल्या समाजाबरोबर समाजातील मागास घटकांना आणण्यासाठी आरक्षण देण्याचा निर्णय केला. त्यानुसार त्याकाळी अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या जाती-जमातींचा मागासवर्गीयांत तर समाजापासून दूर, जंगलात राहणाऱ्या आदिवासींना वेगळ्या आरक्षणाची तरतूद केली. अस्पृश्य किंवा वनवासी नसलेल्या कमालीचे मागासलेपणाने जगणाऱ्या जाती-जमातींचा तिसरा अन्य मागास वर्ग तयार केला. परंतू धनगर समाजाला या तिन्ही प्रकारापासून बाजूला ठेवून या समाजाची लोकसंख्या विचारात घेवून ज्या-त्या राज्यात वेगळे आरक्षण द्यायला पाहिजे, असा विचार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनीच मांडला. धनगर समाजाचे आरक्षण ठरवताना ज्या-त्या राज्यांनी तेथील या समाजाची लोकसंख्या, त्यांचे राहणीमान व मागासलेपण विचारात घ्यावे. केंद्र सरकारकडे शिफारस करून आरक्षण व त्याचे फायदे द्यावेत,

असा निर्णय झाला. अनुसूचित जातींमधील पोट जातींची यादी परिशिष्ट अ, तशीच आदिवासींमधील पोट जातींची यादी तयार करून त्याला घटनात्मक दर्जा दिला.

**बिहार, छत्तीसगडात आरक्षण**

महाराष्ट्रापुरते बोलायचे तर १९५७ मध्ये देशात सगळीकडे आरक्षण लागू झाले. मात्र महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी घटनेत धनगडांना आरक्षण आहे धनगरांना नाही, असा युक्तीवाद करून आरक्षण नाकारले. तेव्हापासून धनगर समाजातील काहींनी घटनेमध्ये ब यादीमध्ये बत्तीस क्रमांकावर उल्लेख केलेला ओरान धनगड हा उल्लेख धनगर जात गृहित धरूनच केलेला आहे. भाषा शास्त्रामुळे 'र' चे 'ड' झाले आहे, जसे जाखरचे जाखड, गुरगावचे गुडगाव झाले तसा हा बदल आहे. मूळ शब्द 'धनगर' असाच आहे असे मांडले. १९७८ मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री वसंतराव (दादा) पाटील यांनी निवडणुकीच्या तोंडावर महाराष्ट्रातील धनगर समाजाला अनुसूचित जातीच्या सवलती द्याव्यात, अशी फसवी शिफारस केली. ती १९८१ मध्ये बॅ. अंतुले मुख्यमंत्री असतांना केंद्र सरकारने 'र' चा 'ड' मानून फेटाळली. महाराष्ट्रातील धनगर समाजातील १३ आमदारांनी विधीमंडळात धनगर समाजाला आरक्षण मिळावे, यासाठी प्रश्न विचारले. यातील एकानेही नेमकी धनगर समाजाची गरज काय आहे आणि सरकारने काय करावे, हे नीट अभ्यासांती मांडले नाही, हे खेदजनक आहे. बिहारमध्ये मुख्यमंत्री नितिश कुमार यांनी धनगर समाजाला अनुसुचित जमातीचे आरक्षण देण्याचा निर्णय घेतला. छत्तीसगडमध्येही आरक्षण दिले. उत्तर प्रदेशात न्यायालयाचा निकालच धनगर समाजाला आरक्षण द्यायला हरकत नसल्याचा आ

महाराष्ट्रात १९९२ मध्ये तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधीच्या उपस्थितीत शेंडगे यांनी सांगलीत आयोजित धनगर समाज मेळाव्यात आरक्षणाचा प्रश्न उपस्थित केला, तेंव्हा गांधी आपल्या भाषणात तत्कालीन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री शरद पवार यांच्याकडे दृष्टीक्षेप करत म्हणाले, ''बापू जो मांग कर रहे हैं इसके बारेमें कुछ करो।'' गांधींच्या सुचनेचे पालन करून धनगर समाजाला अनुसूचित जमातीच्या सवलतींबाबतची शिफारस केंद्र सरकारकडे केली असती तर हा प्रश्न तेव्हाच सुटला असता. महाराष्ट्रात धनगर समाजाची लोकसंख्या बारा ते सोळा टक्के आहे. त्यांना हक्काचे राज्यघटनेने दिलेले आरक्षण मिळवून द्यायला हवे होते ते दिले नाही. आता प्रश्न असा आहे की, अनुसूचित जाती-जमातीचे आरक्षण निश्चित आहे. त्यामुळे इतर मागासांच्या तीस टक्के आरक्षणातच मराठा समाजाला आरक्षण द्यावे आणि मराठा समाजाचीही मागणी तशीच आहे. म्हणजे इतर मागासांच्या (ओबीसी) झोपडीत मराठा समाजाचा आरक्षणरुपी हत्ती शिरला तर त्यांचे काय

होणार? म्हणून आमची मागणी आहे, मराठा समाजाला आरक्षण द्यायचे असेल तर खुशाल द्या. परंतु ते इतर मागासांमधून न देता उर्वरीत पन्नास टक्क्यांतील द्या! त्यासाठी केंद्र सरकारला राज्यघटना दुरुस्तीस भाग पाडा. आरक्षण मिळेपर्यंत आमचा लढा चालू राहणारच आहे. तोपर्यंत ओबीसी म्हणून असलेले तीस टक्के आरक्षणाला कोणीही हात लावता कामा नये, यासाठी लढत राहू.